---

**महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांची सतर्कता ; फिल्मसिटीतील आग नियंत्रणासाठी अग्निशमन दलाला सहकार्य**

21 फेब्रुवारी मुंबई : महामंडळाच्या बाहेरील परिसरात असणाऱ्या झोपडपट्टी भागात (काल) 20 फेब्रुवारी 2025 रोजी रात्री भीषण आग लागली होती. या आपत्तीचे गांभीर्य लक्षात घेऊन महामंडळात कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्र सुरक्षा जवानांनी अग्नीशमन यंत्रणा, पोलीस दल आणि अनुषंगिक घटकांना तत्काळ संदेश देऊन पाचारण केले. तसेच प्रत्येक्ष आग नियंत्रणासाठी अग्निशमन दलाला सहकार्य केले. त्यानी दाखवलेल्या समयसुचकता , प्रसंगवधानामुळे कोणतीही मनुष्यहानी झाली नाही.

याबद्दल महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. धनंजय सावळकर यांनी जवानांचे आणि संबंधित अधिकारी कर्मचारी यांचे विशेष अभिनंदन करुन कौतूक केले आहे.

ही आपत्ती निवारण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील संपूर्ण परिस्थितीवर नियंत्रण ठेवून यंत्रणांना वेळोवेळी मार्गदर्शन आणि सूचना करत होत्या.

त्याचबरोबर वित्तीय सल्लागार मुख्य लेखा वित्तधिकारी चित्रलेखा खातू-रावराणे, कलागरे ( व्यवस्थापक) संतोष खामकर, सहाय्यक कलागरे मुकेश भारद्वाज , मुख्य सुरक्षा अधिकारी अनिल माने, सुरक्षा अधिकारी गणेश पार्टे, मुख्य समन्वयक मोहन शर्मा तसेच इतर कर्मचारीदेखील परिस्थितीवर लक्ष ठेवून होते.